Issue-7 Vol-2
April - 2018

ISSN-2250-0383
IMPACT FACTOR - 0.421

SHODHANKAN

# SHODHANKAN

UGC APPROVED
(SL No. 2630) Journal No. 48999

Quarterly

International

Multi - Disciplinary

Refereed & Reviewed

Research Journal

Chief Editor
Dr. Radhakrishna Joshi

Scanned with CamScanner

( RNI MAH MUL 02988/13/1/2011 – TC VERIFICATION DATE 6/7/2011 )

**ISSN – 2250-0383**

**InternationalMultidisciplinaryReferred& ReviewedResearch Journal**

# SHODHANKAN

**CHIEF EDITOR : Dr. RADHAKRISHNA L. JOSHI**
**Associate Editors : 1. Dr. Kisan M. Ambade**

**EDITORS' BOARD**

Dr.Rajdev T.B.
Dr. Seema Malankar
Dr. Patharkar S.V
Dr. Kanade Ashok
Dr. Dhale N.W.
Dr. Gatti G.V
Dr. Varat T.M.
Dr. Khandat Maya

**INTERNATIONAL EDITORS' BOARD**

Dr. Bhatt Preeti, Rajasthan
Prof. Maduria Mahanta, Asam
Mr. Hrikesh Roy, Bengal
Prof. Reddy Shriniwas, Karnatak
Er. Chadraprakash Upadhyay
USA
Er. Ganjapurkar Sachin, Singapur
Er. SheldenRego, Australia
Prof. Patel Tarun, Gujrat
Prof. Padmawat C.S, Maharashtra.
Ms. Ventaka Aruna, A.P.
Er. Shaikh Naushad, Dubhai.
Dr. Pawar Abhay
India
Er. Dalvir Mall, Canada.

**Single Issue :Rs. 150/- Life Membership – Rs. 5000/-(Ten Years)**
**Each Paper : Rs.1100/- Institution Yearly Rs.1000/-**

**CHIEF ADVISOR – DR. DHARURKAR VIJAYKUMAR. L.**

Scanned with CamScanner

# Index



| S.No. | Paper Name | Name | Page No. |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास | प्रा. डॉ. जोशी आर.एल. | १ ते ३ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ | डॉ. आर.व्ही. ढेरे | ४ ते ९ |
| ३ | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कृषीउदयोग विषयक धोरण | प्रा.डॉ. चौधरी डी.एम. | १० ते १३ |
| ४ | इतिहासाचे पनुर्लेखन | प्रा. डॉ. के. एस. गिरमकर | १४ ते १८ |
| ५ | भांडवशाहीचे स्वरुप | प्रा. शिंदे योगेश प्रकाश | १९ ते २१ |
| ६ | जैन शिक्षण संस्था | पंकज दशरथ खंडारे | २२ ते २५ |
| ७ | मोगल सम्राट अकबराचे सामाजिक योगदान | प्रा. पालवे रामनाथ सुर्यभान | २६ ते २९ |
| ८ | गुरु ग्रंथसाहिब आणि मराठी संत | श्री. अमोल कर्णेवार | ३० ते ३४ |
| ९ | प.पू. गुरुदेव श्री समंतभद्र महाराज-गुरुकूल प्रणालीचे पुनरुज्जीवक | पंकज दशरथ खंडारे | ३५ ते ३८ |
| १० | आहिल्याबाई होळकर : एक महान समाज सुधारक | प्रा. सत्यपाल पांडुरंग बनसोडे | ३९ ते ४७ |
| ११ | वारकरी व शिख धर्म, एकात्मतेचे प्रतिक- संत नामदेव महाराज | श्री. अमोल कर्णेवार | ४८ ते ५१ |
| १२ | महादजी शिंदे यांचे पानिपत युध्दानंतरचे माळवा धोरण : विशेष संदर्भ | प्रा. दिलीप बागुल | ५२ ते ५३ |
| १३ | Historical Tourism Development of Hingoli District, (M.S). | Dr.Pmpalpalle R R | ५४ ते ५८ |
| १४ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे यशापयश | प्रा. जगताप प्रदीप महादेव | ५९ ते ७० |
| १५ | Dalit Literature: Raising Voice Against Oppression. | Mrs Shringar Tiwari | ७१ ते ७४ |
| १६ | Developing A Holistic Approach To Spoken English: A Study In Elt | Mr.Suyog S Dodal | ७५ ते ७९ |
| १७ | Need of Water Management in India. | Dr.Thakur BhagwatPandurang. | ८० ते ८४ |
| १८ | Increase In Area Irrigated By The Farm Pond Of Aurangabad District | Dr. Lahane B.P | ८५ ते ९० |
| १९ | संत तुकारामांच्या गाथा अवलोकनातील दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचा दृष्टिकोन | प्रा. ज्ञानेश्वर गोविंदराव मुंडे | ९१ ते ९३ |



Scanned with CamScanner

POLITICAL SCIENCE
ISSN – 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे यशापयश

प्रा.जगताप प्रदीप महादेव
राज्यशास्त्र विभाग, दादा पाटील महाविद्यालय,कर्जत मों ९९२३०६८१७३

**प्रस्तावना :–** राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना होण्यापूर्वीचे महाराष्ट्राचे राजकारण, राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना व वाटचाल, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची विधानसभा, लोकसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीतील कामगीरी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची सामाजिक पाया विस्ताराची व्यूहरचना याचा अभ्यास केल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे यशापयश समजून घेता येते. सदर शोधपेपरमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना झाल्यापासून म्हणजे १९९९ ते २००९ या कालखंडातील कामगिरीचा आढावा घेऊन निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी आत्तापर्यतच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कामगिरीचाही उल्लेख काही प्रमाणात केला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची अधिमान्यता अभ्यासली असता पुढील निष्कर्ष समोर येतात.

**१) राष्ट्रीय पक्ष म्हणून स्थापना मात्र प्रभाव महाराष्ट्रातच :–**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना १० जून १९९९ रोजी झाली. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला अल्पावधीतच लोकसभा व विधानसभेच्या निवडणूकांना सामोरे जावे लागले. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शेतकरी कामगार पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), जनता दल यांना बरोबर घेऊन निवडणूक लढविली, असे असले तरी १९९९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत पक्षाला फारसे यश संपादन करता आले नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेसला लोकसभेच्या ६ व मित्रपक्षांना ३ अशा एकूण ९ जागा मिळाल्या तर महाराष्ट्र विधानसभेत पक्षाला ५८ जागांवर समाधान मानावे लागले. असे असले तरी १९९९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर काही कालावधीतच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला भारतीय निवडणूक आयोगाने राष्ट्रीय पक्षाचा दर्जा दिला. स्थापने नंतर सर्वात कमी कालावधीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला आहे. भारतातील विविध २२ घटकराज्यांमध्ये आपले अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा प्रदेशबद्ध पक्ष वाटतो. प्रादेशिक पक्ष प्रदेशवादी भूमिकेचा आश्रय घेत नाहीत मात्र ते एखादया राज्यापुरते मर्यादित असतात. कधीतरी ते ही राज्याच्या विकासाबद्दल वगैरे बोलतात, पण त्यांची निर्मिती आणि राजकारण यांचा आधार प्रदेशवादात नसतो. त्या पक्षांना विविध कारणांमुळे एखादया राज्यापुरताच राजकीय पाठींबा मिळतो, त्यांना प्रदेशबद्ध पक्ष म्हणतात, कारण प्रादेशिक सीमांनी ते जखडलेले असतात. जमले तर त्यांना या प्रादेशिक



Scanned with CamScanner

मर्यादा ओलांडायला आवडणार असते, पण त्या पक्षांचे राजकारण, त्यांचे सामाजिक आधार यामुळे ते प्रादेशिक बंधनात अडकलेले असतात. (पळशीकर सुहास, (२००४), समकालीन भारतीय राजकारण : कॉंग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद, प्रतिमा प्रकाशन , पुणे, पृ २५३—२५५) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा सुहास पळशीकर म्हणतात त्याप्रमाणे प्रदेशबद्ध पक्ष वाटतो.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची वाटचाल महाराष्ट्रातील प्रदेशबद्ध पक्ष म्हणून होत असली तरीमहाराष्ट्राच्या राजकारणामध्ये स्वबळावर सत्तेपर्यत हा पक्ष पोहचू शकला नाही. राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातून फूटून बाहेर पडलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला महाराष्ट्रात सत्ता स्थापन करण्यासाठी १९९९, २००४, २००९ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षांबरोबर आघाडी करावी लागली आहे. स्वबळावर हा पक्ष सत्तास्थापन्याच्या जवळपासही पोहचू शकला नाही. तसेच संपूर्ण महाराष्ट्रभरही या पक्षाचा प्रभाव निर्माण होवू शकला नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने विधानसभा व लोकसभा निवडणुकीमध्ये जिंकलेल्या बहुसंख्य जागा या पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. त्यामुळे सदर पक्ष पश्चिम महाराष्ट्रातील प्रभावी पक्ष आहे असे दिसते, ते पुढील तक्त्यावरून स्पष्ट होईल.

विधानसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी कॉंग्रेसची विभागवार कामगिरी

| विभाग | वर्ष | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९९९ | | २००४ | | २००९ | |
| | लढविलेल्या जागा | जिंकलेल्या जागा | लढविलेल्या जागा | जिंकलेल्या जागा | लढविलेल्या जागा | जिंकलेल्या जागा |
| मुंबई | १८ | ०१ | ०७ | ०४ | १७ | ०८ |
| कोकण | १७ | ०४ | १५ | ०९ | ०७ | ०५ |
| उत्तर महाराष्ट्र | ३० | ०७ | २० | १० | १८ | ०९ |
| विदर्भ | ५२ | ०५ | १५ | ११ | १३ | ०४ |
| मराठवाडा | ३४ | ०६ | २१ | ११ | २० | १२ |
| पश्चिम महाराष्ट्र | ६६ | ३५ | ४६ | २६ | ३८ | २४ |
| एकूण | २१७ | ५८ | १२४ | ७१ | ११३ | ६२ |

संदर्भ :— बिरमल नितीन, (२०११), राष्ट्रवादी कॉंग्रेस: महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, पृ.५८

त्याचबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा प्रभाव असणारे महाराष्ट्रातील ९ जिल्हे आहेत. महाराष्ट्रातील ३५ जिल्हयांपैकी ९ जिल्हयात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव जास्त आहे. इतर जिल्हयात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अस्तित्व निर्माण करू शकला नाही. १९९९, २००४, २००९ च्या विधानसभा निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार बहुसंख्येने याच जिल्हयातून निवडून आलेले आहेत.

२) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या संघटनात्मक मर्यादा :—

कोणत्याही राजकीय पक्षाचे मूल्यमापन करण्यासाठी त्या राजकीय पक्षाचे संघटन कसे आहे हे अभ्यासावे लागते. कारण त्या पक्षाचा विस्तार, यशापयश व महत्व हे त्या पक्षाच्या संघटनेवर अवलंबून असते. ' संघटनेच्या



Scanned with CamScanner

ताकदीवरच पक्ष प्रभावीपणे काम करीत असतो. राजकीय पक्षाचा सामाजिक पाया संघटनेच्या मार्फत विस्तारत असतो. राजकीय पक्षांना प्रभावशाली बनविण्यासाठी संघटनेचे माध्यम उपयोगी पडते. संघटनेच्या माध्यमातूनच राजकीय पक्ष समाजात आपले स्थान निर्माण करतात, त्यामुळे संघटना ही राजकीय पक्षासाठी रक्तवाहिनी सारखी असते.' (Thomas C.V, 2001, Political Parties and Interest Groups: Shaping Democratic Governance, Boulder Colorado, Lynne Rienner.,PP.63)

यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आपली संघटनात्मक यंत्रणा निर्माण केली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची निर्मिती राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातून फुटून झालेली असल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची संघटनात्मक यंत्रणा ही राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षासारखीच असल्याचे दिसून येते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची संघटनात्मक यंत्रणा ही दोन विभागात कार्यरत आहे. ते म्हणजे अखिल भारतीय राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष संघटना व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांतर्गतच असलेले पक्षाचे विविध सेल होय. अखिल भारतीय संघटना व पक्षांतर्गत असणारे सेल राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, तालुका, गाव पातळीवर कार्यरत आहेत

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची १० वर्षाची वाटचाल अभ्यासली असता पक्षाची संघटनात्मक मर्यादा पुढीलप्रमाणे दिसून येतात.

अ) देशभर विस्तार नाही :—

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना राष्ट्रीय पक्ष म्हणून झालेली आहे. असे असले तरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची संघटनात्मक यंत्रणा देशभर सक्रीयपणे काम करताना दिसून येत नाही. काही राज्यातच संघटना कार्यरत असलेली दिसते. ' देशातील बहुतेक सर्वच राज्यात कॉंग्रेसमधील असंतुष्ट म्हणजे राष्ट्रवादी कॉंग्रेस असे पक्षाचे स्वरूप आहे. त्यामुळे छत्तीसगड, मध्यप्रदेश सारख्या राज्यात जिथे राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष तुलनेने बळकट आहे, तिथे राष्ट्रवादी कॉंग्रेसला विधानसभा निवडणुकीत यश मिळू शकलेले नाही. महाराष्ट्रात मात्र पक्षाने बऱ्यापैकी यश मिळवलेले आहे. पक्षाची महाराष्ट्रात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, प्रवक्ता, चिटणीस या पदांची मिळून कार्यकारिणी आहे. (बिरमल नितीन, (२०११), राष्ट्रवादी कॉंग्रेस: महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, पृ.६७.)

**ब) संघटनेचा कायम स्वरूपी कार्यक्रम नाही :—**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या संघटनेकडून कायम स्वरूपी राबविला जात असणारा कार्यक्रम नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची संघटना ही निवडणुकीच्या कालावधीत सक्रीय काम करताना दिसते. मात्र निवडणुकीच्या व्यतिरीक्त पक्षाच्या संघटनेकडून ठोस असे काम होताना दिसत नाही. पक्षाच्या कार्यकर्त्यांना बांधून ठेवणारा कार्यक्रम नाही.

क) संघटनेतील अंतर्गत गटबाजी :—

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांच्या संघटनेमध्ये अंतर्गत गटबाजी असल्याचे दिसते. पक्षाची संघटना एकसंधपणे कार्य करताना दिसत नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेत्यामध्ये अंतर्गत धूसफूस असल्याचे दिसते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष



Scanned with CamScanner

शरद पवार यांना मानणारा एक गट आहे तो गट शरद पवार यांना आपला नेता मानतात व त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे काम करतात. त्यामध्ये प्रामुख्याने दिलीप वळसे – पाटील, सुप्रिया सुळे, हसन मुश्रीफ, मधुकर पिचड, छगन भुजबळ, दिलीप सोपल यांचा समावेश होतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या संघटनेमध्ये असणारा दुसरा गट म्हणजे अजित पवार यांना मानणारा आहे. हा गट अजित पवारांना आपला नेता मानतात व त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे काम करतात. त्यामध्ये अभय भोसले, संग्राम जगताप, रमेश थोरात, वैभव पिचड यांचा समावेश होतो. संघटनेच्या अंतर्गत अशी गटबाजी असल्याने पक्षाचे काम एकजुटीने करणारी यंत्रणा राहत नाही. पक्षातील कार्यकर्ते पक्षनिष्ठ बनण्याऐवजी व्यक्तिनिष्ठ बनलेले आहेत.

ड) पक्षांशी संलग्न असणाऱ्या जातीय संघटना :—

'राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अंतर्गत प्रत्येक नेत्याचे एक—एक संस्थान आहे. अशा अनेक नेत्यांच्या संस्थानांना एक छताखाली आणणे व त्यांच्यात समन्वय ठेवणे हेच त्यामुळे पक्षनेतृत्वाचे काम बनले आहे. या प्रत्येक नेत्याचा एकेका जिल्हयात जातीमुळे स्वत:चा प्रभाव आहे. त्यांचा हा प्रभाव त्या त्या मतदारसंघात पक्षाच्या दृष्टीने महत्वाचा आहे, असे असले तरी त्या जातीय संघटनामुळे संबंधित नेत्यांनी पक्षीय संघटनेबाहेर आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले आहे. त्यामुळे या संघटनांचा पक्षावर दबावही तयार होताना दिसतो. उदा. छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून काढून टाकल्यावर त्यांनी ओबीसी पक्ष काढावा, असा ठराव समता परिषदेने केला होता.'(बिरमल नितीन, (२०११), राष्ट्रवादी कॉंग्रेस: महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, पृ.६७—६८.) प्रत्येक नेत्याच्या स्वत:च्या संघटना पक्षाच्या चौकटीबाहेर जाऊन पक्षविरोधी कृती करताना दिसतात. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची अधिकृत मान्यता नसतानाही काही मराठी नेत्यांनी आपल्या संघटनेद्वारे मराठा आरक्षणाचा मुद्दा राजकीय व्यासपीठावर आणल्याचे दिसते. त्याचा परिणाम पक्षाच्या कामगिरीवर झाल्याचे दिसते.

'विशिष्ट समाजगटाचे राजकारण करणाऱ्या नेत्यांची मानसिकता पक्षाच्या व्यापक राजकारणात सहजासहजी मिसळून जात नाही. पक्षामध्ये आपल्याला दडपलं जाईल, आपल्या वाटयाला दुजाभाव येईल, त्यावेळी आपल्या समाजगटाच्या ताकदीच्या आधारेच आपण पक्षांतल राजकारण सुलभपणे आणि ताकदीने रेटून नेऊ, अशी भावना या नेत्यांच्या मनात असते. त्यामुळेच पक्षाचं व्यापक राजकारण करण्याचं नेतृत्व मिळाले तरी हे नेते पक्षाबाहेर आपल्या समाजगटाचं संघटन मोडू देत नाहीत.' (देशपांडे पद्मभूषण, (२०१०), नेत्यांच्या राखीव फौजा कशासाठी ?,दै.सकाळ, सप्तरंग, ४ जुलै, पृ.१)

इ) संघटनेपेक्षा नेत्यांचा व्यक्तिगत प्रभाव :—

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये संघटनेपेक्षा त्या पक्षामध्ये काम करणाऱ्या नेत्यांचा व्यक्तिगत प्रभाव जास्त आहे. त्यामुळे पक्षापेक्षा त्या नेत्यांना महत्व प्राप्त झाल्याचे दिसते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील बहुसंख्य नेत्यांचा ऐकेका जिल्हयात जातीमुळे किंवा सहकारी संस्थांमुळे स्वत:चा प्रभाव आहे. त्यांचा हा प्रभाव त्या त्या मतदारसंघात पक्षीय संघटनेपेक्षा महत्वाचा आहे. त्यामुळे पक्षाचे कार्य

व्यक्तीच्या तंत्राने, इच्छेने चालते. साहजिकच त्या व्यक्तिच्या प्रभावामुळे पक्षशिस्त आणि पक्ष संघटना यांना हरताळ फासला जातो.

'राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची पक्ष संघटना आज प्रत्येक गावात, तालुक्यात आणि जिल्हयात आहे पण ही पक्ष संघटना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची आहे की त्या गावातील, तालुक्यातील आणि जिल्हयातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या एखाद्या अभिजनाची आहे हे पाहिल्यास पक्षसंघटनेचे वास्तव समजेल.' (डेरे गोरक्षा, (२०१४), राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आता वास्तव स्वीकारावे !, परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ जून)

ई) कार्यकर्त्यांपेक्षा नेत्यांचा प्रभाव :—

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षावर टिका करताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे म्हणतात की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा काही नव्याने स्थापन झालेला नाही. ती वैयक्तिक बळावर निवडून येणाऱ्या नेत्यांची मोळी आहे. यातील पक्षीय स्पर्धेचे राजकारण बाजूला ठेवले तरी त्यातील मतीतार्थ बाजूला करण्यासारखा निश्चितच नाही, कारण राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा अभ्यास केल्यानंतर त्या टिकेमध्ये सत्यही आहे. राजकीय पक्ष स्थापन करताना त्याची एक निश्चित भूमिका, विचारधारा आणि धोरण असायला लागते ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडे नाही.

राष्टवादी कॉंग्रस हा पक्ष हा शरद पवारांनी परिश्रम करून एकेक कार्यकर्ता जोडून वाढविलेला पख नाही किंवा आपली विचारसरणी लोकांपर्यत पोहोचवून, जनाधार निर्माण करून काढलेला पक्ष नाही. कॉंग्रेस पक्षामधील आपल्याला मानणाऱ्या गटाला बाहेर काढून त्यांनी त्याला अस्तित्वात आणले आहे. कॉंग्रेसमधून राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये सहभागी नेते स्वयंभू आहेत. बरेचसे साखरसम्राट, शिक्षणसम्राट आहेत. त्यांची त्या त्या भागात असलेली वैयक्तिक प्रतिमा पक्षाल पुरेसा बेस निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरली. आर्थिकदृष्टया हे नेते सबळ असल्याने पक्षामागे पैसाही मजबूत उभा राहिला. शिवसेना, भाजपा, मनसे या पक्षाकडे विशिष्ट विचारधारा आहे, ती रूजविण्यासाठी पक्षाच्या प्रमुखांनी बरीच मेहनत घेतली, त्यातून कार्यकर्ते तयार झाले व हे कार्यकर्तेच पुढे नेते झाले. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात मात्र नेते आधी आले आणि मग त्यांचे कार्यकर्ते आले आहेत, त्यामुळे थोडे डावलले की पक्ष सोडून जाणाऱ्यांचे प्रमाण राष्ट्रवादीमध्येही आहे. थोडक्यात निष्ठावंतांची कमी आहे.

३) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वैचारिक मर्यादा :—

राजकीय पक्ष जेव्हा स्वतंत्र सामाजिक — आर्थिक जाणिवांच्या संघटनातून उभे राहतात तेव्हा त्यांच्या वैचारिक भूमिका, तात्विक आधिष्ठाने व कार्यक्रमात्मक आशय यांना काटेकोर वेगळेपणा प्राप्त होतो. भारतात तसे झालेले नसल्यामुळे सर्वच पक्षांचे वैचारिक तोंडावळे सारखेच आहेत. राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचीच विचारसरणी स्पष्ट नसल्यामुळे त्याच्यापासून फुटून बाहेर पडलेले पक्षही वैचारिकदृष्टया संदिग्धच राहिले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा त्यातीलच एक पक्ष आहे. 'राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची निर्मिती राष्ट्रीय कॉंग्रेस मधून झालेली असल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची विचारसरणी आणि राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाची

विचारसरणी जवळपास सारखीच असल्याचे दिसते.' (बिरमल नितीन, (१९९९), प्रबळ जातीचा प्रादेशिक पक्षः राष्ट्रवादी कॉंग्रेस, समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टो — डिसेंबर, पृ. २२० — २२५) त्यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या विचारप्रणालीचा आधार घेत असल्याचे दिसते.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विचारसरणीत सातत्य दिसत नाही. कालांतराने त्यामध्ये बदल झालेले दिसतात. उदा. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना होताना देशातील सर्वोच्च पदावर म्हणजे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, लष्कर प्रमुख, निवडणुक आयोगाचे प्रमुख या पदावर परकीय वंशाच्या व्यक्तीला नेमू नये अशी भूमिका घेतली. त्या मुद्दावर १९९९ ची लोकसभा व विधानसभा निवडणूक लढविली. मात्र १९९९ च्या विधानसभा निकालानंतर हा मुद्दा सोडून महाराष्ट्र सरकारमध्ये राष्ट्रीय कॉंग्रेस बरोबर आघाडी करून सत्तेत सहभाग मिळविला, तसेच २००४ मध्ये देशपातळीवर सोनिया गांधी नेतृत्व करीत असलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडीत सहभाग घेतला. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विचारप्रणालीतील परकीय वंशाचा मुद्दा क्षीण झाला.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष समताधिष्ठीत समाजरचनेचा पुरस्कार करतो. सार्वजनिक जीवनात सामाजिक न्याय प्रस्थापित झाला पाहीजे याचा आग्रह धरतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे पुरोगामी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष जातीयवादाला विरोध करतो, मात्र प्रत्यक्षात पक्षामध्ये जातीय राजकारण खदखदत असलेले दिसते. 'राष्ट्रादी कॉंग्रेस पक्षाचे नेते तत्कालीन पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनी मातंग समाजाला एससी मध्ये ५ टक्के आरक्षण आणि अण्णाभाऊ साठेंना भारतरत्न पुरस्कार दया, अशी मागणी घेऊन दिल्लीला राष्ट्रपती महोदयांची भेट घेतली, त्यातून पक्षांतर्गत जातीवादीला तोंड फुटल्याचे दिसते. विधानसभा निवडणुकी दरम्यान त्यांनी पक्षातील दलितगटाचा वेगळा मंच स्थापन केला होता, तसेच तत्कालीन उपमुख्यमंत्री छगन भुजबळ हे राष्ट्रवादीत राहून आपला ओबीसींचा स्वतंत्र गट चालवतात. ओबीसींसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावेत असा आग्रह त्यांनी धरला होता.' (आवारे राजा, (२०१०), राजकीय पक्षांच्या चुली मातीच्याच, दैनिक पुढारी, २१ सप्टें, पान — ४) यातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची जातीनिरपेक्ष प्रतिमा तयार होत नाही.

५) महिला सहभाग अल्प प्रमाणात :—

महिलांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष प्रयत्नशील असल्याचे दिसते. मात्र व्यापक प्रमाणात महिलांना पक्षात सहभागी करून घेण्यात पक्षाला यश आल्याचे दिसत नाही. पक्षाचे अध्यख शरद पवार हे पुरोगामी विचाराचे म्हणून ओळखले जातात. त्यांनी महिलांचे सबलीकरण व्हावे यासाठी राज्य महिला आयोगाची निर्मिती, राज्य सरकारमध्ये महिला व बालविकास खात्याची निर्मिती, महिला धोरण, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना आरक्षण असे महत्वाचे निर्णय घेतले. महिलांचा पक्षातील सहभाग वाढविण्यासाठी पक्षामध्ये स्वतंत्र महिला आघाडी काम करते. तिची कार्यकारिणी



Scanned with CamScanner

गाव, तालुका, जिल्हा, प्रदेश पातळीवर कार्यरत आहे. तसेच युवतींचा सहभाग वाढविण्यासाठी पक्षाने पक्षांतर्गत १० जून २०१२ मध्ये राष्ट्रवादी युवती संघटनेची स्थापना केली आहे, त्याचप्रमाणे पक्षातील महत्वाच्या नेत्या सुप्रियाताई सुळे महिलांचे प्रश्न हाती घेवून महिला नेतृत्व करू पहात आहेत. असे असले तरी एकूणच पक्षातील महिलांचा सहभाग मात्र कमी आहे.

राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने महिलांना कमी प्रमाणात सहभागी करून घेतले आहे. ही बाब राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने लोकसभा व विधानसभा निवडणूकीमध्ये महिलांना किती प्रमाणात उमेदवारी दिलेली होती यावरून स्पष्ट होते. राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने महिलांना दिलेली उमेदवारी पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

लोकसभा निवडणुकीतील महिला उमेदवार व त्यांची कामगिरी

| निवडणुक वर्ष | पक्षाने उभे केलेले एकूण उमेदवार | पक्षाने उभे केलेले महिला उमेदवार | जिंकलेल्या एकूण जागा | जिंकलेल्या महिला उमेदवार |
|---|---|---|---|---|
| १९९९ | १३२ | ०९ | ०८ | ०१ |
| २००४ | ३२ | ०५ | ०९ | ०२ |
| २००९ | ६८ | ०७ | ०९ | ०२ |
| एकूण | २३२ | २१(९.०५) | २६ | ०५(१९.२३) |

संदर्भ :— Statistical report on general elections 1999, 2004, 2009 to the loksabhaa

विधानसभा निवडणुकीतील महिला उमेदवार व त्यांची कामगिरी

| निवडणुक वर्ष | पक्षाने उभे केलेले एकूण उमेदवार | पक्षाने उभे केलेले महिला उमेदवार | जिंकलेल्या एकूण जागा | जिंकलेल्या महिला उमेदवार |
|---|---|---|---|---|
| १९९९ | २२३ | ०६ | ५८ | ०२ |
| २००४ | १२४ | ०५ | ७१ | ०५ |
| २००९ | ११३ | ०६ | ६२ | ०२ |
| एकूण | ४६० | १७(३.६९) | १९१ | ०९(४.७१) |

संदर्भ :— Statistical report on general elections 1999, 2004, 2009 to the legistative assembly of Maharashtra

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने १९९९, २००४, २००९ या तीन लोकसभा निवडणुकीत एकूण २३२ जागा लढविल्या व २६ जागा जिंकल्या आहेत. पक्षाने लढविलेल्या एकूण जागांच्या फक्त ९.०५ टक्के महिलांना संधी दिली आहे. म्हणजे २१ महिलांना पक्षाने उमेदवारी दिली होती. २१ जागांपैकी महिलांनी ५ जागा जिंकल्या आहेत. महिलाच्या यशाचे प्रमाण १९.२३ टक्के आहे. असे असले तरी पुरूषांच्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. थोडक्यात राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने महिलांना कमी प्रमाणात संधी दिली आहे.



Scanned with CamScanner

विधानसभेतील महिलांची उमेदवारी व जिंकलेल्या जागा या तक्त्यावरूनही महिलांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने अल्प प्रमाणात उमेदवारी दिली आहे हे स्पष्ट होते. १९९९, २००४, २००९ या विधानसभा निवडणुकीत पक्षाने एकूण ४६० जागा लढविल्या व १९१ जागा जिंकल्या आहेत. लढविलेल्या ४६० जागामध्ये फक्त १७ महिलांना संधी देण्यात आली होती. म्हणजे ३.६९ टक्के महिलांना संधी दिली गेली, तर जिंकलेल्या १९१ जागामध्ये ९ महिला आहेत, म्हणजे ४.७१ टक्के महिला त्यामध्ये आहेत. हे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने पक्षाने महिलांना अल्प प्रमाणात संधी दिल्याचे स्पष्ट होते.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने दिलेल्या महिला उमेदवारांचा अभ्यास केल्यास समोर येणारी बाब म्हणजे बहुतेक सर्व महिला उमेदवार या राजकीय कुटूंबाची पार्श्वभूमी असणाऱ्या आहेत. त्यांचे राजकारण वारशाच्या आधारावर अवलंबून आहे. त्या राजकारणात आहेत कारण बहुसंख्य महिलां या कुणान ˎ कुणाच्या लेकी, सुना, बायका, विधवा, आया, भावजया, बहिणी आहेत. त्यांचे राजकारण हे पुरूषांशी निगडीत आहे. महिलांचा राजकीय सहभाग पुरूष नियंत्रणाखाली होत राहिल्यामुळे महिलांचे स्वतंत्र राजकीय नेतृत्व पक्षामध्ये विकसित झाले नाही. स्थानिक पातळीवर महिलांचा सहभाग वाढला असला तरी तेथेही निर्णय निश्चितीचे क्षेत्र पुरूषांकडे राहिले, त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षापुढे महिलांचा सक्रिय सहभाग वाढविणे एक आव्हान आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये प्रभावी महिला नेतृत्वाची फळी नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये सुप्रियाताई सुळे, वंदना चव्हाण, चित्रा वाघ या काही महिलाच पक्षाचे कार्य पुर्णवेळ करताना दिसतात. महिलांचे नेतृत्व हे राजकीय पक्षाचे बल स्थान असते. महिला नेतृत्व पक्षात नसेल तर समाजातील एक मोठा वर्ग त्या पक्षापासून दूर रहात असतो, त्यामुळे पक्षामध्ये महिला नेतृत्वाला संधी देणे आवश्यक असते, असे असले तरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यत प्रभावी महिला नेतृत्व निर्माण करण्यात अपयश आले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील महिला नेतृत्वाचा पक्षाच्या कार्यकारीणीतील सहभाग व प्रभाव अल्प प्रमाणात आहे. महिलांचा राजकीय सहभाग मोर्चे, आंदोलने, मतदान करणे अशा सीमित अर्थाने मर्यादित झालेला आहे. निवडणुका लढविण, राजकीय सत्तेतील निर्णयप्रक्रियेत सहभाग घेणे वगैरे जणू पुरूषांचे कार्य आहे असे चित्र आहे. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये म्हणजे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका यामध्ये ३३ टक्के आरक्षण होते. ते सध्या ५० टक्के करण्यात आले आहे, त्यामुळे स्थानिक पातळीवर या स्थानिक स्वराज्य संस्थांत पक्षातील महिला सहभागी व यश मिळविताना दिसत आहेत, असे असले तरी स्थानिक पातळीवर आरक्षण असल्याने महिलांना नेतृत्व करण्याची संधी मिळते मात्र दुसऱ्या वेळेस ती संधी मिळताना दिसत नाही. तसेच ज्या महिलांना राजकीय वारसा आहे त्यांनाच संधी

मिळाल्याचे दिसते, त्यामुळे त्यांच्यावर, त्यांच्या निर्णयावर पुरूषीवर्चस्व असलेले दिसते.

**६) इतर मागसवर्गीयांना सहभागी करून घेण्यात अल्प यश :–**

महाराष्ट्रात 'ओबीसी' ही जाणीव मंडल आयोगाच्या आंदोलनापासून उदयाला आली आहे. त्यापूर्वी या सर्व ओबीसी समाजघटक 'बहुजन समाज' या राजकीय वर्गवारीत भावनिक आधारावर सामावला गेला होता. मंडल आयोगाने महाराष्ट्रातील २७२ जातींचा समावेश इतर मागास जातींमध्ये केलेला आहे, यामध्ये माळी, धनगर, वंजार, बंजारा, तेली, लेवापाटील, आगरी, सुतार, सोनार, कुंभार, शिंपी या प्रमुख जातींचा समावेश होतो. जमीन मालकी असणाऱ्या ओबीसींना राजकारणात चांगल्या प्रकारे स्थान मिळाल्याचे दिसते. महाराष्ट्रातील ओबीसी राजकारणाचा विचार करता असे दिसून येते की स्वतंत्र राजकारण निर्माण करण्याचे प्रयत्न फार कमी प्रमाणात झालेले आहेत. भारिप – बहुजन महासंघाकडून प्रयत्न झाले, पण त्यास ओबीसीकडून पाठिंबा मिळालेला नाही. उलट ओबीसी नेतृत्वाकडून प्रस्थापित राजकीय पक्षात राहून हितसंबंध जोपासण्याचे प्रयत्न झालेले आहेत.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आपला सामाजिक पाया विस्तारण्यासाठी ओबीसी नेत्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. ओबीसी नेत्यांना, त्यांच्या जात संघटनांना आपलेसे करण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने केला आहे. त्यामध्ये छगन भुजबळ, जयदत्त क्षीरसागर, गणेश नाईक, प्रकाश शेंडगे, जितेंद्र आव्हाड यांचा उल्लेख करता येईल. छगन भुजबळ हे राष्ट्रवादी कॉंग्रेस मधील महत्वाचे ओबीसी नेते म्हणून ओळखले जातात. १९९९ मध्ये आघाडी सरकारमध्ये सहभागी झाल्यावर ओबीसींना आपलेसे करण्यासाठीच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने छगन भुजबळांना उपमुख्यमंत्री पद देवू केले होते. असे असले तरी ओबीसींचा व्यापक पाठींबा मिळविण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला मर्यादित यश मिळाले आहे.

ओबीसी समाजात ज्या प्रमुख जाती आहेत, त्यांच्यातील प्रत्येक जातींतर्गत अनेक सामाजिक संघटना आहेत. माळी समाजाची समता परिषद ही संघटना संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेली आहे. या संघटनेचा कल हा जरी छगन भुजबळ यांच्यामुळे राष्ट्रवादीला पाठींबा देण्याचा असला तरी ओबीसी समाजाचा उमेदवार जर विरोधी पक्षांकडून असेल तर त्या उमेदवारास ही पाठींबा राहिलेला आहे. अर्थात मतदरासंघनिहाय संघटनेने पाठिंबा देण्याचे प्रयोजन केलेले दिसते.

धनगर समाजातील 'महाराष्ट्र राज्य धनगर समाज महासंघ' , 'यशवंत सेना' आणि 'धनगर उन्नती महामंडळ' या राज्यभर पसरलेल्या संघटना आहेत. या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष जरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये असले तरी मतदारसंघ निहाय 'ओबीसी' या भावनिक आधारावर पाठिंबा देण्याचे प्रयोजन करत पाठींबा देताना दिसतात. उदा. धनगर समाजातील सांगली जिल्हयात प्रकाश शेंडगे हे राष्ट्रवादी कडून उमेदवार होते, त्यामुळे त्या मतदारसंघापुरता सर्व धनगर समाजाचा पाठींबा हा राष्ट्रवादीला होता. मात्र इतर मतदार संघात धनगर आणि ओबीसी उमेदवार पाहून इतर पक्षांतील उमेदवारांनाही पाठींबा देताना धनगर समाज



Scanned with CamScanner

दिसतो, त्यामुळे सर्व धनगर समाज किंवा माळी समाजाला सामावून घ्यायला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष कमी पडताना दिसतो.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा प्रबळ मराठा जातीचा पक्ष म्हणून ओळखला जातो, त्यामुळे साहजिकच ओबीसी नेतृत्वाला फारशी संधी पक्षात मिळालेली नाही. ही बाब पक्षातील निवडून आलेल्या सदस्यांमध्ये ओबीसींचे उमेदवार किती यावरून स्पष्ट होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील ओबीसी आमदारांची संख्या पुढील तक्त्यात दिली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील ओबीसी आमदारांची संख्या

| निवडणूक वर्ष | एकूण निवडून आलेले आमदार | निवडून आलेले ओबीसी आमदार |
|---|---|---|
| १९९९ | ५८ | ०३ |
| २००४ | ७१ | ११ |
| २००९ | ६२ | १२ |
| एकूण | १९१ | २६ |

संदर्भ :— घोळवे सोमनाथ, (२०१५), ओबीसी राजकारण : कॉंग्रेस ते भाजपा सेना प्रवास, महाराष्ट्राचे राजकारण नव्या वळणावर...? , युनिक प्रकाशन, पुणे, पृ.६९

ओबीसी समाजाला फारशी संधी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये मिळू शकलेली नाही. ओबीसी समाजघटकांची एक प्रबळ अशी जाणीव जागृती झाल्यामुळे त्यांच्यामध्ये प्रतिनिधित्व करण्याची महत्वकांक्षा निर्माण होताना दिसते, त्यामुळे ओबीसी समाज संधी मिळेल त्या पक्षात सहभागी होताना व त्या पक्षाला पाठींबा देताना दिसतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये ओबीसी समूहांना उमेदवारी देण्याचे प्रमाण कमी असल्याने ओबीसी समाजाचा पाठींबा मिळण्याचे प्रमाणही कमी असलेले दिसते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला ओबीसी समाजातील किती टक्के मतदारांनी पाठींबा दिला हे पुढील तक्त्यावरून स्पष्टा होईल.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला ओबीसींचा मिळणारा पाठींबा (टक्केवारीत)

| निवडणूक वर्ष | ओबीसींचा पाठींबा (टक्केवारीत) |
|---|---|
| १९९९ | १६ |
| २००४ | १६ |
| २००९ | १३ |

संदर्भ :— बिरमल नितीन, (२०११), राष्ट्रवादी कॉंग्रेस महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षांची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, पृ.६६

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील ओबीसी आमदार व मतदारसंघ पाहिले असता असे दिसून येते, निवडून आलेले आमदार हे ओबीसी पॉकेट्स असणारे मतदारसंघ आहेत. पॉकेट्स शिवाय ओबीसी आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून निवडून आलेले आहेत असे चित्र दुर्मिळ आहे. महाराष्ट्रातील ओबीसी समाजामध्ये धनगर व माळी या जाती महाराष्ट्रभर प्रभावी आहेत. धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यात व त्या संदर्भात ठोस भूमिका घेण्यात राष्ट्रवादी



Scanned with CamScanner

काँग्रेस पक्षाला अपयश आलेले आहे. त्यामुळे हा जातीसमूह पक्षापासून दुरावू लागला आहे.

७) दलित मतदार पाठीशी ठेवण्यात अल्प यश :—

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मा. शरद पवार हे यशवंतराव चव्हाणांचे वारसदार मानले जातात. यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणाचे अनुकरण शरद पवार यांनी तंतोतंत केल्याचे दिसते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्याबरोबर दलित मतदारांना आपलेसे करण्यासाठी शरद पवार यांनी दलितांचा असणारा पक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया — आठवले गट यांच्या बरोबर युती केली. आंबेडकरी चळवळीला आपलेसे करण्यासाठी सामाजिक समरसतेची भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतली.

महाराष्ट्राच्या राजकारणात आंबेडकरी विचारांचे लोक किंवा दलित मतदार महत्वाची भूमिका बजावताना दिसतात. आंबेडकरी विचारांचे राजकारण करणारे पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाचे विविध गट व बहुजन समाज पक्ष ओळखले जातात. मात्र या पक्षांना स्वबळावर एकही जागा जिंकता आली नाही, त्यामुळे त्यांना वेळोवेळी इतर पक्षांशी युती करणे अपरिहार्य ठरत आहे, असे असले तरी महाराष्ट्रातील एकूण मतदारांमध्ये दलित मतदारांची संख्या ८ टक्केच्या आसपास असल्याने निर्णायक आहे, त्यामुळे या समुदायावर सर्वच प्रस्थापित राजकीय पक्षांचा डोळा असतो, या समुदायाला आकर्षित करण्याचा प्रयत्न ते करताना दिसतात. तसेच रिपब्लिकन पक्षाचा पाठींबा मिळविणे म्हणजे स्वत:च्या पुरोगामीत्वावर शिक्कामोर्तब करणे होय असे मोठया पक्षांना वाटते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही त्याला अपवाद नाही.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे मूळचे समाजवादी विचारांचे व सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते असल्याने ते नेहमीच समाजातील उपेक्षित वर्गाच्या बाजूने उभे राहिलेले आहेत. समाजातील उपेक्षित वर्गाविषयीची विशेष आस्था त्यांनी आपल्या जीवनात बाळगलेली आहे, हे त्यांनी आपल्या कृतीतूनच समाजाला दाखवून दिलेले आहे. त्यांची ही आस्था निव्वळ सामाजिक न्यायाच्या विचारातून, कळकळीतून, लोककल्याणाच्या भावनेतून व मानवतावादातून जन्माला आलेली आहे. मंडल आयोगाची अंमलबजावणी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर हे पुरोगामी निर्णय शरद पवार यांनी घेतले. या पुरोगामित्वासाठी सत्तेचीही कदर त्यांनी केली नाही. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा शरद पवारांनी जपला आहे, त्यांचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला झालेला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने दलित मतांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आठवले गटाबरोबर युती १९९९ मध्ये केली, त्यामुळे १९९९, २००४ च्या विधानसभा व लोकसभेच्या निवडणुकीत यशामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दलित मतांचा पाठींबा मिळाल्याचे दिसते. मात्र एप्रिल—मे २००९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस — राष्ट्रवादीतील मराठा नेत्यांच्या असहकार्यामुळे आपला शिर्डी लोकसभा मतदारसंघातून पराभव झाला, अशी रामदास आठवले यांची भावना झाल्याने त्यांनी वीस वर्षापासूनचे शरद पवारांशी असलेले सहकार्य



Scanned with CamScanner

तोडून रिपाइं ऐक्यासाठी आणि तिसऱ्या आघाडीसाठी पुढाकार घेतला, त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाबरोबर असणारी रिपब्लिकन पक्षाची (आठवले गट) युती संपुष्टात आली.

**निष्कर्ष:–** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा राष्ट्रीय पक्ष असला तरी त्याचा प्रभाव महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वात जास्त दिसून येतो.राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची निर्मिती राष्ट्रीय कॉंग्रेस मधून झालेली असल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची विचारसरणी आणि राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाची विचारसरणी जवळपास सारखीच असल्याचे दिसते. महिलांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष प्रयत्नशील असल्याचे दिसते. मात्र व्यापक प्रमाणात महिलांना पक्षात सहभागी करून घेण्यात पक्षाला यश आल्याचे दिसत नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा प्रबळ मराठा जातीचा पक्ष म्हणून ओळखला जातो, त्यामुळे साहजिकच ओबीसी नेतृत्वाला फारशी संधी पक्षात मिळालेली नाही. दलित मतदार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षा पासून दूरावत आहे.

**संदर्भ ग्रंथसूची:–**


१) Thomas C.V, 2001, Political Parties and Interest Groups: Shaping Democratic Governance, Boulder Colorado, Lynne Rienner.,PP.63

२) Statistical report on general elections 1999, 2004, 2009 to the loksabhaa

3) Statistical report on general elections 1999, 2004, 2009 to the legistative assembly of Maharashtra

४) बिरमल नितीन, (२०११), राष्ट्रवादी कॉंग्रेस: महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, पृ.६७.

५) देशपांडे पद्मभूषण, (२०१०), नेत्यांच्या राखीव फौजा कशासाठी ?,दै.सकाळ, सप्तरंग, ४ जुलै, पृ.१

६) डेरे गोरक्षा, (२०१४), राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आता वास्तव स्वीकारावे !, परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ जून

७) बिरमल नितीन, (१९९९), प्रबळ जातीचा प्रादेशिक पक्ष: राष्ट्रवादी कॉंग्रेस, समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टो – डिसेंबर, पृ. २२० – २२५

८) आवारे राजा, (२०१०), राजकीय पक्षांच्या चुली मातीच्याच, दैनिक पुढारी, २१ सप्टें, पान – ४

९) घोळवे सोमनाथ, (२०१५), ओबीसी राजकारण : कॉंग्रेस ते भाजपा सेना प्रवास, महाराष्ट्राचे राजकारण नव्या वळणावर...? , युनिक प्रकाशन, पुणे, पृ.६९

१०) पळशीकर सुहास, (२००४), समकालीन भारतीय राजकारण : कॉंग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद, प्रतिमा प्रकाशन , पुणे, पृ २५३–२५५

११) बिरमल नितीन, (२०११), राष्ट्रवादी कॉंग्रेस: महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, पृ.५८





Scanned with CamScanner